## प्रेस नोट

### दिड कोटीची लुट झाल्याचा बनाव केला पोलीसांनी चोवीस तासात उघड

रविवार पेठ पुणे येथील सराफ व्यवसायिक श्री. अरविंद चोप्रा यांचे सराफ पेढीवर नोकरीस असलेला इसम बेहराराम शांतीलाल पुरोहीत, वय-३१ वर्ष, रा-३१ सी टिंबर मार्केट, श्री.संघवी यांचे दुकान, सावित्रीबाई फुले विद्यालय समोर, पुणे मुळ राहणार - राजस्थान हा मालकाचे सांगणे वरुन मुंबई झव्हेरी बाजार येथे जावुन तेथुन १,३५,००,०००/- रु. किमतीचे ४५०० ग्रॅम सोन्याची एकुण ४५ बिस्किटे व ५ किलो चांदी घेवुन प्रवासी वाहनाने मुंबई ते पुणे येथे येत असताना महाळुंगे - बालेवाडी स्टेडियम समोर पुणे येथे सदर वाहनामधुन उतरुन पुणे स्टेशनकडे जाणे करिता भाड्याच्या रिक्षाने जात असताना रिक्षामध्ये अनोळखी तीन इसमांनी घुसुन त्यास चाकुचा धाक दाखवुन त्याचेकडील वरील ऐवज व मित्रांनी दिलेले ६०,०००/- रु. तसेच एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन असा माल जबरदस्तीने चोरुन नेले बाबतची तक्रार दिल्याने त्याबाबत हिंजवडी पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. १५१/२०१८ भा.दं.वि.कलम ३९२,५०६(२),३४ प्रमाणे गुन्हा दाखल झालेला आहे.

दाखल गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने वरिष्ठ पोलीस अधिकारी श्री. प्रदिप देशपांडे, अप्पर पोलीस आयुक्त सो. उत्तर प्रादेशिक विभाग, श्री. गणेश शिंदे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -३, श्री. पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, पुणे, श्री. समिर शेख, सहा. पोलीस आयुक्त गुन्हे -१,पुणे, मा. श्री. विक्रम पाटील, सहा. पोलीस आयुक्त, चःतुश्रृंगी विभाग, पुणे यांनी गुन्ह्याचे ठिकाणी भेटी देवुन गुन्हे शाखा, परिमंडळ -३ व हिंजवडी पोलीस स्टेशन कडील अधिकारी व कर्मचारी यांची पथके तयार करुन तपास कामाचे नियोजन केले.

गुन्ह्याचे तपासात फिर्यादी बेहराराम शांतीलाल पुरोहीत याचेकडे गुन्ह्याचे अनुषंगाने तपास करता तो सांगत असलेल्या हकीकतीमध्ये अनेक तफावती आढळुन आल्या त्याबाबत त्यास विश्वासात घेवुन तपास केला असता त्याने सदरचा गुन्हा हा घडलाच नसल्याचे कबुल केले. त्याने त्याचा मित्र किशोर रावल व नरेश रावल यांचे मदतीने कट रचुन त्याने झव्हेरी बाजार येथुन घेतलेली ४५०० ग्रॅम सोन्याची बिस्किटे व चांदी ही आपला मित्र किशोर रावल रा. नालासोपारा, ठाणे यांचेकडे दिली असल्याचे सांगितले.

या तपासकामी आरोपीला सुगावा लागु न देता विविध पथकांचे मार्फतीने धारावी, अंधेरी, सायन, भाईंदर, व नालासोपारा अशा वेगवेगळ्या ठिकाणी समन्वयाने केलेल्या त्वरित कार्यवाहीमुळे गुन्ह्यात गेलेला १०० टक्के माल परत मिळविण्यात यश आले आहेच आणि त्या व्यतिरीक्त ५ किलो चांदीही आरोपींकडुन हस्तगत करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्वरित वरील पथकांनी केलेल्या संयुक्त कामगिरीत किशोर रावल यास ताब्यात घेवुन तपास केला असता त्याने बेहराराम पुरोहित याने दिलेली सोने व चांदी असलेली पिशवी आपण आपला चुलत भाऊ नरेश रावल रा. भाईंदर ठाणे याचेकडे दिल्याचे सांगितले. तेव्हा नरेश रावल यास भाईंदर येथुन ताब्यात घेवुन त्याचेकडील किं.रु. १,३६,५०,०००/- रु. किं.ची ४५०० ग्रॅम वजनाची ४५ सोन्याची बिस्किटे व ५ पाच किलो चांदी जप्त करण्यात आली आहे. दाखल गुन्ह्याचे कामी गुन्ह्यातील फिर्यादी १) बेहराराम शांतीलाल पुरोहीत, वय-३१ वर्ष, रा-३१ सी टिंबर मार्केट, श्री.संघवी यांचे दुकान, सावित्रीबाई फुले विद्यालय समोर, पुणे मुळ राहणार - राजस्थान, २) किशोर लक्षण रावल वय २८ वर्षे, रा. डी. ३०३, कलश बिल्डिंग, लिंक रोड, नालासोपाला, पुर्व, ठाणे, मुळ राहणार - राजस्थान, ३) नरेश जयरुपजी रावल वय २१ वर्षे, रा. फ्लॅट नं. १२१, पुनम वंदना बिल्डिंग, कस्तुरी इंडस्ट्रीज पाटक रोड, भाईंदर इस्ट ठाणे मुळ राहणार - राजस्थान यांनी सदरचा गुन्हा हा कट रचुन केल्याचे व त्याबाबत लुटल्याचा बनावट गुन्हा दाखल केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना गुन्ह्याचे कामी ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे. वरील आरोपीतांना मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती पानसरे सो. यांचे कोर्टात हजर करुन त्याची आम्ही सरकारी वकिल बेंडबर मॅडम यांचे मार्फतीने दि. ०३/०४/२०१८ रोजी पर्यंत अशी ५ दिवस पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त, सो. रश्मी शुक्ला मॅडम, सह पोलीस आयुक्त सो. श्री. रविंद्र कदम सो. श्री. प्रदिप देशपांडे, अप्पर पोलीस आयुक्त सो. उत्तर प्रादेशिक विभाग, श्री. पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री. गणेश शिंदे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -३, श्री. समिर शेख, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे -१, श्री. विक्रम पाटील, सहा. पोलीस आयुक्त, चःतुश्रृंगी विभाग, पुणे यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक, नितीन भोसले पाटील, युनिट १, श्री. सिताराम मोरे, पोलीस निरीक्षक, युनिट - ३, राजेंद्र कदम, दरोडा प्र.वि., रघुनाथ जाधव, खंडणी वि.प., विजय पळसुळे, वपोनि. निगडी पो.स्टे. तसेच हिंजवडी पोलीस स्टेशन कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण वायकर, पो.नि. (गुन्हे), आर.बी. उंडे, सहा. पोलीस निरीक्षक, गणेश धामणे, वनिता धुमाळ, देवेंद्र चव्हाण, सहा. पोलीस निरीक्षक, निगडी पोलीस स्टेशन,पुणे, पोलीस उप निरीक्षक माने, वाकड पोलीस स्टेशन व तपास पथकातील कर्मचारी यांनी केले आहे.


हिंजवडी पोलीस स्टेशन, पुणे शहर


My #BuddyCop
“ I immensely pledge my support to the BuddyCop system for making our Pune city, a safe city for women. ”
“ I aim to make safety a reality rather than a mere perception and this program is a foundation stone in that direction. ”
पुणे शहर पोलीस


Amway
My #BuddyCop